मराठी भाषिक मंडळ एडमंटन

# अनुबंध

शनिवार, जून २०, २०१५



**या अंकात:**

विचार 1
मागील कार्यक्रम 2
विशेष 3
माहिती आणि संपर्क 4

**॥ नव्या बांधूया रेशीमगाठी, जपण्या अपुली मायमराठी ॥**

आपले सर्वांचे मराठी वृत्तपत्र

(E-Newsletter)

**अनुबंध**

संपादक : ऋजुता मुधोळकर

## एक विचार

आयुष्यात मला भावलेलं एक गुज सांगतो. उपजिविकेसाठी आवश्यक असणाऱ्या विषयाचं शिक्षण जरुर घ्या.

पोटापाण्याचा उद्योग जिद्दीनं करा, पण एवढ्यावरच थांबू नका. साहित्य, चित्र, संगीत, नाट्य, शिल्प, खेळ ह्यांतल्या एखाद्या तरी कलेशी मैत्री जमवा.

पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवील, पण कलेशी जमलेली मैत्री तुम्ही का जगायचं हे सांगून जाईल.-पु.ल. देशपांडे

---*---

एकदा अकबर आणि बिरबल शिकरीला जात असतात, तलवार काढताना अकबर चा अंगठा कापला जातो... अकबरला खूप त्रास होतो, तो ओरडायला लागतो...तो शिपायांना वैद्य घेऊन या म्हणून शहरात पाठवतो... तेवढ्यात बिरबल त्याच्या जवळ जातो आणि म्हणतो, "महाराज...शांत व्हा...जे होतं ते चांगल्यासाठीच होतं..." अकबरला राग येतो. तो जास्तच चिडतो आणि शिपायांना सांगतो. " जा बिरबलला घेऊन जा...रात्रभर उलटं टांगून ठेवा आणि सकाळी- सकाळी फाशी द्या " सर्व शिपाई तिथून निघून जातात. अकबर एकटाच जंगलात असतो. तो एकटाच पुढे शिकार करायला जातो !! पुढे काही आदिवासी त्याला पकडून घेऊन जातात, आणि त्याला डांबून ठेवतात. अकबरचा बळी ते देणार असतात. त्यासाठीचा विधी करण्यात आदिवासी मग्न होतात. तितक्यात एका आदिवासीची नजर अकबरच्या तुटलेल्या अंगठ्याकडे जाते व तो ओरडून सर्वांना सांगतो " हा अशुद्ध आहे. आपण याचा बळी नाही देऊ शकत. याचा अंगठा तुटलेला आहे.” आदिवासी अकबरला सोडून देतात आणि त्याला बिरबलचं बोलणं आठवतं. ' जे होतं ते चांगल्यासाठीच होतं.' तो धावत पळत त्याच्या महालात येतो, बिरबलला फाशी होणारच असते तितक्यात तो तिथे जाऊन बिरबलला घट्ट मिठी मारतो आणि सर्व हकीकत सांगतो आणि म्हणतो, " मला माफ कर. तुझ्यामुळे मी वाचलो आणि बघ माझ्यामुळे तुझी काय हालत झाली." बिरबल हसतो आणि म्हणतो, "नाही महाराज, जे होते ते चांगल्यासाठीच होत." अकबर स्तब्ध होतो आणि विचारतो असं कसं ? तुला माझ्यामुळे खूप त्रास झाला, चांगलं कसं झालं ??? त्यावर बिरबल म्हणतो, " महाराज, मी जर तुमच्यासोबत शिकरीला आलो असतो तर त्यांनी माझा बळी दिला असता . म्हणून म्हणतो जे होतं ते चांगल्यासाठीच होतं. “तात्पर्य : मित्रांनो, आयुष्यात असे क्षण येतील जेंव्हा तुम्ही खचून जाल, पण लक्षात ठेवा जे होतं ते चांगल्यासाठीच होतं. .कदाचित पुढे त्याचा ऊपयोग तुमच्या चांगल्यासाठी होईल !!!



***जाऊ बाई जोरात***

लेखक -पुरुषोत्तम बेर्डे

संकलन - ऋजुता मुधोळकर

दिगदर्शन -अनुपमा शेट्टे

संगीत - राकेश शेट्टे

**-कलाकार –**

उपमुखेन्द्र सिंग जाधव -स्वरूप खेर

मुख्येन्द्र सिंग यादव -हेमंत बेदाणे

अवंतिका बाई काळे जोशी देशपांडे -अनुपमा देशपांडे

सीतालंका कोल्हापूरकर -अनीता वानखडे

मालविका बाई चाबुकस्वार -रचना पाटील

चारुलता चोरघडे -मनाली देशपांडे

डॉक्टर सौतिशा मोकळे पाटील -ऋत्वी म्हात्रे

निशा काशीकर -अनुपमा शेट्टे

आयेशाबेगम चारुढेकणे -ऋजुता मुधोळकर

---***---

**मनाली देशपांडे**



## महाराष्ट्र दिन : दिनांक ९ मे २०१५

* माउली माउली गाण्या वर नृत्य *आज गोकुळात नंद खेळतो हरी गाण्या वर नृत्य * नगाडा संग ढोल बाजे गाण्या वर नृत्य * कविता वाचन *ती फुलराणी नाटकातील काही भाग तसेच

*"जाऊ बाई जोरात" नाटकातील पहिला अंक सादर करण्यात आले. नाटकाच्या सुरुवातीला मनाली देशपांडेने केलेली अस्सल मराठ-मोळी लावणी खास लक्षात राहिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला करण्यात आलेले नेपाळ भूकंप ग्रस्तांसाठी केलेल्या विनंतीस उपस्थित असलेल्यांनी मनापासून साद दिली आणि $ 1,101 नेपाळ भूकंपग्रस्त फंड साठी देण्यात आले. **सभासदांचे मन:पूर्वक आभार !!**

*$ 1,101 raised for Nepal Earthquake Relief Fund by voluntary donations & MBME, the amount was remitted to Canadian Red Cross thru Nepalese Canadian Association in Edmonton.*

---

## गुढीपाडवा : मार्च १४, २०१५

नवीन वर्षाच्या निमित्ताने एडमंटन मध्ये नव्यानेच आलेल्या मराठी मंडळींचं स्वागत आणि ओळख अशी नव्या वर्षाची चांगली सुरुवात झाली . त्याच बरोबर ज्येष्ठ मंडळीनी सुरु केलेल्या *अनुबंध* नावालाच पुढे घेऊन या newsletter ची सुरुवात करण्यात आली.

---

** पुढील कार्यक्रम- आपला पुढील कार्यक्रम हा सहलीचा असणार आहेकार्यक्रमाची साविस्तर माहिती email ने लवकरच कळवण्यात येइल.

---

We are proud to announce that

**Manali Deshpande**

**The Arangetram - Classical Dancer**

received an opportunity to perform Dance Fusion on Bharatnatyam + Katthak in the RISE-2015 award ceremony held at Northlands by Edmonton Mennonite Centre for Newcomers. This was the prestigious ceremony in Corporate & Immigrants' sector. 500 viewers attended the program. It was one of the few selective presentations on the occasion !!!




**मनःपूर्वक अभिनंदन**

## मैथिली जाधव

Maithili Jadhav won Silver medal in Jr. Singles Badminton EPSB city championship.
We are proud of you !



**रारंगढांग झेपावला लॉस एंजिलीस कडे !!!**

जुलै २ ते ५, २०१५ रोजी लॉस एंजिलीस ला भरणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळ ऑफ नॉर्थ अमेरिकेच्या १७ व्या अधिवेशना साठी मराठी भाषिक मंडळ एडमंटन ने सादर केलेल्या प्रभाकर पेंढारकर लिखीत मराठी साहित्य अभिवाचन "रारंग ढांग" ची निवड करण्यात आली आहे. ही आपल्याकरता कौतुकाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. हिमालयातील रारंग ढांग मधून जाणारऱ्या बॉर्डर रोडच्या बिकट बांधकाम ची जबाबदारी असणाऱ्या एका तत्ववादी civil engineer च्या स्वभावातल्या सचोटीची आणि तितक्याच शिस्तीच्या military ऑफिसर च्या जिद्दीच्या संघर्षाची हि एक कथा.

-------------

**अग अग सुनबाई..काय म्हणता सासूबाई .. जाऊया कॅलगरीला !!**

खास उल्लेख करण्यासारखे "अग अग सुनबाई .... काय म्हणता सासूबाई" टीम ला कॅलगरी मराठी मंडळ कडून खास प्रयोगासाठी आमंत्रण.
प्रयोगानंतर कॅलगरी मंडळा कडून एडमंटन मराठी मंडळा ला $300 ची भेट.










India Film Festival of Alberta 2015
Edmonton Movie Club
**Edmonton July 17 – 19**

Sponsored by the Edmonton Movie Club (EMC), and taking place across 5 different cities in Alberta, the first India Film Festival of Alberta (IFFA) will showcase the best Indian films from a variety of languages,

**Marathi film 'COURT' to be shown in Metro Theater (Whyte Ave) on July 18, 2015 for the first time in the city, as a part of Indian Film Festival**

**Visit edmontonmovieclub.ca and metrocinema.org for a full schedule and festival details.**

---

To join MBME or to renew membership for the year 2015, fees in cash or by cheque payable to "MBME" The details of fees are as -

Family - $160.00

Couple (or with child up to 2 years of age) - $120.00

Single - $80.00

Student - $50.00

Members may bring their guest payable at the rate of $15 in cash or cheque. Non-members are welcome by paying $15 /person

Contact Email: mbmedmontonorg@gmail.com

Facebook : https://www.facebook.com/MarathiBhashikMandalEdmonton

---

We are inviting contributions from you and your family members in the form of articles, stories, poems, art, recipes, travel reports, how-to articles etc. Please encourage your children to contribute too – a special section will be included for our बाल मंडळी as well. If you have earned any awards, publications or recognition for notable work in your area of expertise and would like to share that with the community, we would be happy to include that in the Newsletter.

Your submissions can be in Marathi or English, and should include a brief and fun bio (1 or 2 sentences) with your full name, age for children. Please send in your contributions to **mbmenewsletter@gmail.com**

**MBME**
**Executive Committee Members**

**President** : Shailesh Arora
**Vice President**: Anupama Deshpande
**Secretary**: Anagha Deshpande
**Treasurer** : Sanjay Deshpande
**Member at Large**: Amol Sagare
**Member at Large** : Vijay Datar